।।ज्ञानदिप लावू जगी।।

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे,**

**स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय**

**म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे**

(नॅक प्रमाणित B ग्रेड (CGPA – 2.41))

# राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष श्रमसंस्कार शिबीर अहवाल

**शैक्षणिक वर्ष**

**२०२२-२३**

प्राचार्य

**NOT ME**  **BUT YOU**

**डॉ. शिवाजी पाटील**

| कार्यक्रम अधिकारी | महिला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी | सहाय्यक कार्यक्रम अधिकारी |
|---|---|---|
|  |  |  |
| डॉ. रमेश अहिरे | डॉ. वनिता पवार | डॉ. बाबासाहेब मोताळे |

आज़ादी का अमृत महोत्सव

# राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर अहवाल (२०२२-२३)

आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे,

### स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय

म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे

### अनुक्रमणिका


| अ.क्र. | विवरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | १ |
| २. | शिबिरातील कार्यक्रमांचा संक्षिप्त अहवाल | २-११ |
| ३. | वर्तमान पत्रातील बातम्यांची कात्रणे | १२-१३ |
| ४. | शिबिरात उपस्थित स्वयंसेवकांची यादी | १४-१५ |


**NOT ME BUT YOU**



माझ्यासाठी नव्हे, तर तुमच्यासाठी हे ब्रीदवाक्य लक्षात घेऊन राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक सेवेची मूल्ये आणि सामाजिक भान ठेऊन समाजसेवेसाठी तत्पर असतो. आपले उज्ज्वल भविष्य गाठत असतानाच समाज व राष्ट्राला आपण काही देणे लागतो म्हणून फुल न फुलाची पाकळी या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाद्वारे राष्ट्रसेवा करण्याचे कार्य महाविद्यालयीन युवक करीत असतो. राष्ट्रीय सेवा योजनेच्या बोधचीन्हाप्रमाणे आजचा स्वयंसेवक हा बोधचिन्हाच्या आठ आरेनुसार अष्टौप्रहर समाजसेवेसाठी बांधील आहे व लाल रंग हे तरुणांचे सळसळते रक्त हे राष्ट्र उभारणीचे प्रतिक  असल्याचे दिसून येते. राष्ट्रीय सेवा योजना राबवित असलेल्या उपक्रमातून देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, सामाजिक बांधिलकी यासाठी स्वयंसेवक तत्पर व सक्षम व्हावा, यासाठी राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम व विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर या दोन उपक्रमांद्वारे समाजप्रबोधन करण्याचे कार्य करीत आहे.

स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय म्हसदी, येथील राष्ट्रीय सेवा योजना एककाची १७० स्वयंसेवकाची तुकडी असून; यात प्रामुख्याने ग्रामीण व डोंगरी भागातील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी सहभागी असतात. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. सी. अहिरे, महिला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, प्रा. डॉ. व्ही. टी. पवार आणि सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बी. टी. मोताळे व इतर प्राध्यापक वृंद यांच्या मार्गदर्शनाखाली या माध्यमातून विविध समाजउपयोगी उपक्रम नियमित कार्यक्रमांतर्गत राबवित असते. प्रत्येक वर्षी दत्तक गावात सात दिवसीय निवासी विशेष शिबिराच्या माध्यमातून स्वयंसेवकांचा व्यक्तिमत्व विकास करतांना त्यांना ग्रामीण जीवनातील समस्यांची ओळख करून देत त्या सोडविण्यासाठी निस्वार्थ काम करण्यास युवकांना प्रेरित करते.

नियमित कार्यक्रमाच्या या अहवालास शुभेच्छा !!!!!

डॉ. शिवाजी पाटील

प्राचार्य

स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे

# राष्ट्रीय सेवा योजना

## १. प्रस्तावना

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात समाज सेवेची जाणीव निर्माण व्हावी, समाजाच्या सुख दु:खाशी त्यांनी समरस व्हावे. समाजाच्या तळागाळातील व्यक्तीपर्यंत त्यांची नाळ जोडली जावी, सामाजिक प्रश्नांच्या जाणीवेतून कर्तव्य भावना आणि श्रम प्रतिष्ठा निर्माण व्हावी, तसेच समाज सेवेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास व्हावा आणि राष्ट्रसेवा घडावी, या उद्देशाने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने २४ सप्टेंबर १९६९ रोजी भारताचे तत्कालीन शिक्षण मंत्री मा. व्ही. के. आर. व्ही. राव यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची सुरुवात केली.

## २. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककाची स्थापना

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव अंतर्गत म्हसदी येथे आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्था, धुळे संचलित स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय, ता. साक्री, जि. धुळे येथील म्हसदी गावी सन १९९८ मध्ये महाविद्यालयाची सुरुवात झाली. म्हसदी पंचक्रोशीतील ग्रामीण व डोंगरी भागातील विद्यार्थी विशेषत: मुलींसाठी उच्च शिक्षणाची सोय व्हावी. ग्रामीण व डोंगरी भागातील शेवटच्या घटकापर्यंत उच्च शिक्षणाची ज्ञान गंगोत्री पोहचावी. याउद्देशाने महाविद्यालय सुरु झाले. सन २००० साली महाविद्यालयाला ५० स्वयंसेवकांचे एकक सुरु करण्याची मान्यता तत्कालीन उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने दिली. अशा रीतीने महाविद्यालयात सन २००० पासून राष्ट्रीय सेवा योजनेचे एकक स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महविद्यालय, म्हसदी येथे कार्यरत आहे. कालांतराने विद्यापीठाच्या मान्यतेनुसार एककातील स्वयंसेवकांची संख्या १५० होती. **सन २०२२-२३ पासून १७० झाली आहे.** आज रोजी १७० स्वयंसेवकांचे एकक महाविद्यालयात कार्यरत आहे.

सन २०२२-२३ पासून राष्ट्रीय सेवा योजनेत १७० स्वयंसेवक नोंदणीकृत केले जातात. या १७० पैकी ८५ स्वयंसेवकांची तुकडी सात दिवसीय निवासी शिबिरासाठी निवडले जातात. राष्ट्रीय सेवा योजना एककाला दर तीन वर्षाकरिता एक गाव दत्तक म्हणून घेतले. या दत्तक गावात पर्यावरण, आरोग्य, जलसंवर्धन व संधारण, शासन राबवीत असलेले योजना व उपक्रम याविषयी माहिती व जनजागृतीचे उपक्रम नियमित कार्यक्रम आणि शिबिरांतर्गत राबविले जातात. सन २०२०-२१ ते २०२२-२३ या तीन वर्षाच्या कालावधीकरीता धनदाई डोंगर, मु. पो. म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे हे गाव दत्तक गाव म्हणून घेण्यात आले. या गावात राष्ट्रीय सेवा योजनेचे जनजागृतीपर विविध उपक्रम व सात दिवसीय नियमित शिबीर घेतले. **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चे सात दिवसीय निवासी शिबीर दि. ३१ जानेवारी २०२३ ते ०६ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत राबविण्यात आले.** शिबिराचा संक्षिप्त वृतांत पुढील प्रमाणे सादर आहे.

## ३. शिबिराचा संक्षिप्त अहवाल

राष्ट्रीय सेवा योजनचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर दि. **३१ जानेवारी २०२३ ते ०६ फेब्रुवारी** २०२३ या सात दिवसाकरिता निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरासाठी खालील प्रमाणे नियोजित प्रकल्प ठरविण्यात आले होते.

### ≈ नियोजित प्रकल्प ≈

- व्होकल फॉर लोकल
- स्वच्छ भारत अभियान
- पर्यावरण व आरोग्य जनजागृती
- आपत्ती व्यवस्थापन, शाश्वत ग्रामविकास
- स्वच्छता, ऊर्जा बचत
- पाणी व्यवस्थापन, अन्न पदार्थ सुरक्षा जनजागृती
- माझी वसुंधरा अभियान
- स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव
- पोक्सो कायदा जनजागृती
- सिकलसेल जनजागृती

NOT ME BUT YOU

राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिरासाठी खालील प्रमाणे दैनंदिनी ठरविण्यात आली होती.

## ≈ शिबीर दैनंदिनी ≈

| वेळ | कार्यक्रम | वेळ | कार्यक्रम |
|---|---|---|---|
| सकाळी ५.०० ते ६.१५ | व्यायाम व योगासन | दुपारी ३.०० ते ४.३० | व्याख्यान सत्र |
| सकाळी ६.३० ते ६.५५ | अल्पोपहार व चहा | संध्याकाळी ४.४५ ते ५.१५ | चहापान |
| सकाळी ७.०० ते १० | श्रमदान | संध्याकाळी ५.२० ते ७.०० | मैदानी खेळ व गटचर्चा |
| सकाळी १० ते ११.१५ | स्वयंस्वच्छता | संध्याकाळी ७.१५ ते ८.०० | भोजन |
| सकाळी ११.३० ते दु. २ | भोजन व विश्रांती | रात्री ८.१५ ते ९.३० | सामाजिक विचारमंच व सांस्कृतिक कार्यक्रम |
| दुपारी २.१५ ते ३.०० | गीतमंच | रात्री ९.४५ ते ९.५५ | प्रार्थना व दिपमालवण |

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिरासाठी दररोज दुपारी ३.०० ते ४.०० आणि ४.०० ते ५.०० या काळात वैचारिक प्रबोधनाचे आयोजन करण्यात आले. त्याचा सविस्तर विवरण तक्ता खालीलप्रमाणे.

| दिनांक | प्रमुख वक्ते | उपक्रम/विषय |
|---|---|---|
| ३१/०१/२०२३ मंगळवार | प्रा. डॉ. हेमंतकुमार पाटील | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० |
| | प्रा. डॉ. वाल्मिक आढावे | राष्ट्रीय सेवा योजना आणि सामाजिक बांधिलकी |
| ०१/०२/२०२३ बुधवार | प्रा. संजय नामदेव तोरवणे | युवकांचा ध्यास आणि कृषीतून ग्राम विकास |
| | श्री. भटू वाणी | पत्रकारिता आणि युवक |
| ०२/०२/२०२३ गुरुवार | प्रा. संजय भदाणे | मी आणि माझ्या परंपरा |
| | श्री. आर. के. चव्हाण | कृषीतून ग्राम विकास |
| ०३/०२/२०२३ शुक्रवार | प्रा. विलास चव्हाण | रा. से. यो. स्वयंसेवकांची जबाबदारी आणि कर्तव्य |
| ०४/०२/२०२३ शनिवार | डॉ. वैभव सबनीस | मानसिक ताणतणावाचे व्यवस्थापन काळाची गरज |
| | सौ. वर्षा देवरे | स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन |
| ०५/०२/२०२३ रविवार | डॉ. उमेश गांगुर्डे | राष्ट्रीय सेवा योजना आणि नेतृत्व विकास |
| ०६/०२/२०२३ सोमवार | प्राचार्य, डॉ. सुनील बाविस्कर | संवाद कौशल्य कला |
| | डॉ. सिध्दार्थ सोनवणे | जल व्यवस्थापन काळाची गरज |

## शिबिराचा पहिला दिवस (३१ जानेवारी, २०२३)

दि. ३१ जानेवारी २०२३ रोजी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. सकाळी १०.०० वाजता कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेचे पूजन करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. शिबिराच्या उद्घाटनासाठी दत्तक गावातील माजी सैनिक श्री. अनिल देवरे यांना आमंत्रित करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन माजी सैनिकांच्या हस्ते करण्यात आले. शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी खालील प्रमुख अतिथी उपस्थित होते.

### ≈ उद्घाटक ≈

• मा. श्री. अनिल लोटन देवरे •
माजी सैनिक, म्हसदी

### ≈ कार्यक्रमाचे अध्यक्ष ≈

• मा. दादासाहेब श्री. संजयकुमार रामचंद्र देवरे •
अध्यक्ष, आ.ध.मा.शि.प्र. संस्था, धुळे

### ≈ प्रमुख पाहुणे ≈

• मा. दादासाहेब श्री. सुभाष गजमल देवरे •
अध्यक्ष, धनदाईदेवी तरुण ऐक्य मंडळ, म्हसदी

• मा. ताईसाहेब सौ. शैलेजा राजेंद्र देवरे •
सरपंच, ग्रामपंचायत, म्हसदी

• मा. आबासाहेब श्री. राजाराम माणिक देवरे •
उपाध्यक्ष, आ.ध.मा.शि.प्र. संस्था, धुळे

• मा. ताईसाहेब डॉ. सौ. संजिवनी संजयकुमार देवरे •
सचिव, आ.ध.मा.शि.प्र.संस्था, धुळे

• मा. ताईसाहेब डॉ. सुजाता सुनील सोनवणे •
खजिनदार, आ.ध.मा.शि.प्र. संस्था, धुळे

• मा. इंजि. बाबासाहेब श्री. कुणाल संजयकुमार देवरे •
संचालक, आ.ध.मा.शि.प्र. संस्था, धुळे

• मा. प्रा. डॉ. प्रमोद गोकुळ पाटील •
राष्ट्रीय सेवा योजना, धुळे जिल्हा समन्वयक

दुपारी २ ते ३ वाजे दरम्यान स्वयंसेवकांचे ग्रुप तयार करण्यात आलेत. प्रत्येक ग्रुपला आपापसात चर्चा करून ग्रुप लीडर निवडण्याची संधी देण्यात आली. प्रत्येक ग्रुपने आपला एक ग्रुप लीडर निवडला. सात दिवसासाठी सात ग्रुप तयार करण्यात आले. प्रत्येक ग्रुप मधील सदस्याने आपली ओळख दिली. स्वयंसेवकांना शिबिराची दैनंदिनी समजून देण्यात आली.

दुपारी ३ ते ५ या काळात वैचारिक प्रबोधनपर दोन व्याख्याने घेण्यात आली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२०. या विषयावर रासेयो साक्री तालुक्याचे विभागीय समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील यांचे वैचारिक प्रबोधनपर व्याख्यान झाले आणि राष्ट्रीय सेवा योजना आणि सामाजिक बांधिलकी या विषयावर व्याख्यानाचे रासेयो धुळे जिल्हा माजी समन्वयक डॉ. वाल्मिक आढावे यांचे व्याख्यान आयोजन करण्यात आले. संध्याकाळी ५ ते ७ मैदानी खेळ व गट चर्चा घेण्यात आली. गट चर्चेसाठी गटप्रमुखांनी विषय ठरवून त्यावर चर्चा केली. रात्री ७ ते ८ रात्रीचे भोजन झाले. भोजनानंतर रात्री ८ ते १० वाजेपर्यंत सांस्कृतिक कार्यक्रम कोणकोणते असावेत याचे मार्गदर्शन करण्यात आले. स्वयं सेवकांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केल.








# विशेष श्रमसंस्कार शिबीर - उदघाट्न समारंभ, क्षणचित्रे













# शिबिराचा दुसरा दिवस : ०१ जानेवारी २०२३

शिबीराच्या दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात ५.०० ते ७.०० वाजेपर्यंत योगासने, व्यायाम आणि प्रार्थना घेण्यात आली. सकाळी ८ ते ११.०० धनदाई देवी मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. मंदिर परिसरात मोठयाप्रमाणात प्लॅस्टिक कचरा साचलेला होता. सर्वत्र अस्वच्छता होती. स्वच्छता अभियान राबवून पूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला.






दुपारी १२ ते २ स्वयंसेवकांना स्वयंस्वच्छता व भोजन व विश्रांतीसाठी वेळ देण्यात आला. दुपारी २.१५ ते ३.०० वाजेपर्यंत गीतमंच या उपक्रमांतर्गत स्वयंसेवकांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे गीत व देश भक्तीपर गीत सादर केली.

दुपारच्या सत्रात ३.०० ते ४.०० वाजेपर्यंत वैचारिक प्रबोधनपर व्याख्यानांचे आयोजन केले. यादरम्यान पिंपळनेर महाविद्यालयाचे **प्रा. संजय नामदेव तोरवणे** यांनी **युवकांचा ध्यास आणि कृषीतून ग्राम विकास** या विषयावर वैचारिक प्रबोधन केले. ४.०० ते ५.०० या वेळेत पुण्य नगरीचे पत्रकार, **श्री. भटू वाणी** यांनी **पत्रकारिता आणि युवक** याविषयावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.




रात्रीच्या सत्रात ७.२० ते १०.०० वाजे दरम्यान स्वयंसेवकांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.






सांस्कृतिक कार्यक्रम सादर करतांना स्वयंसेवक



# शिबिराचा तिसरा दिवस : ०२ जानेवारी २०२३

शिबीराच्या तिसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात ५.०० ते ७.०० वाजेपर्यंत योगासने, व्यायाम आणि प्रार्थना घेण्यात आली. सकाळी ८ ते ११.०० दत्तक गावात **प्लॅस्टिक कचरा मुक्ती अभियान आणि स्वच्छता अभियान** राबविण्यात आले. गावातील आदिवासी वस्ती, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि प्राथमिक शाळा याठिकाणी स्वच्छता अभियान राबिण्यात आले. आदिवासी वस्तीत मोठयाप्रमाणात प्लॅस्टिक कचरा साचलेला होता. सर्वत्र अस्वच्छता होती. स्वयंसेवकांनी स्वच्छतेचा संदेश देत पूर्ण आदिवासी वस्ती परिसर स्वच्छ केला. नाल्या, गटारी तुंबलेल्या होत्या त्याही स्वयंसेवकांनी स्वच्छ केले.






# स्वच्छता अभियान राबवितांना स्वयंसेवक









दुपारच्या सत्रात १२.०० ते २.०० वाजेपर्यंत स्वयंस्वच्छता आणि भोजन अवकाश करिता वेळ देण्यात आली. दुपारी २.३० ते ३.०० वाजेपर्यंत उपस्थिती आणि राष्ट्रीय सेवा योजना गीतमंच घेण्यात आले. ३.०० ते ५.०० यासत्रात वैचारिक प्रबोधनपर व्याख्यानांचे आयोजन केले.

३.०० ते ४.०० वाजे दरम्यान दहिवेल महाविद्यालयाचे रसायन शास्त्र विषयाचे **प्रा. संजय भदाणे** यांचे **'मी आणि माझ्या परंपरा'** या विषयावर व्याख्यान झाले. प्रा. भदाणे सरांनी ग्रामीण भागातील प्रचलित परंपरांचे दाखले देत. स्वयंसेवकांचे वैचारिक प्रबोधन केले.

४.०० ते ५.०० वाजे दरम्यान म्हसदी गावातील आदर्श शेतकरी **श्री. आर. के. चव्हाण** यांचे **'कृषीतून ग्राम विकास'** या विषयावर व्याख्यान झाले. श्री.आर.के. चव्हाण यांनी शेंद्रीय शेतीचे महत्व व शेंदरी खत आणि अर्क कसे तयार करतात. शेंद्रीय शेतीतून दर्जेदार शेती उत्पादन कसे मिळविता येते याचे मार्गदर्शन स्वयंसेवकांना वैचारिक प्रबोधनातून केले. सायंकाळच्या सत्रात ५.२० ते ७.०० वाजे दरम्यान मैदानी खेळ आणि गट चर्चा घेण्यात आली. स्वयंसेवकांना गट चर्चेसाठी स्वच्छता अभियान हा विषय देण्यात आला होता. या गट चर्चेत प्रत्येक गटातील गट प्रमुखाने चर्चेचा विषसादर केला. प्रत्येक गटातील सदस्यांनी देखील आपापले मत मांडले. या गट चर्चेच्या माध्यमातून शिबिरात सहभागी सर्व विध्यार्थ्यांना बोलके करावे. प्रत्येकाला आपले व्यक्तिमत्व घडविता यावे. याउद्देशाने प्रत्येकाला सहभाग घेणे बंधनकारक करण्यात आले. यातून नेतृत्व गुण विकास होण्यास प्रत्येकाला संधी देण्यात आली.

रात्री ७.२० ते ८.०० रात्रीचे भोजन देण्यात आले. ८.०० ते १०.०० वाजे दरम्यान गीत मंच आणि सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यासाठी प्रत्येक गटाला बंधनकारक करण्यात आले. यादरम्यान स्वयंसेवकांनी आपले पारंपारिक व स्थानिक लोककला सादर केल्या. अंधश्रद्धा निर्मुलनपर नाटिका सादर केले. याचबरोबर स्थानिक नृत्यकला देखील सादर करण्यात आले. रात्रीच्या कार्यक्रमांचे आयोजनाची जबाबदारी त्या दिवसाच्या सर्विस ग्रुपवर सोपविण्यात आली.



# शिबिराचा चौथा दिवस : ०३ जानेवारी २०२३

शिबीराच्या चौथ्या दिवशी सकाळच्या सत्रात ५.०० ते ७.०० वाजेपर्यंत रोजच्या प्रमाणे योगासने, व्यायाम आणि प्रार्थना घेण्यात आली. सकाळी ८ ते ९.०० दरम्यान स्थानिक परिसरात व मंदिर परिसरात स्वच्छता करण्यात आली. चौथ्या दिवशी कार्यक्रमाच्या संदर्भात काही बदल करण्यात आला. वैचारिक प्रबोधन दुपारच्या सत्र ऐवजी सकाळच्या सत्रात सकाळी १०.०० ते ११.३० या दरम्यान घेण्यात आले.

वैचारिक प्रबोधनासाठी कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे माजो संचालक **प्रा. विलास चव्हाण** यांना आमंत्रित करण्यात आले. प्रा. विलास चव्हाण यांनी **'राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवकांच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्य'** याविषयावर मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक स्वावलंबी आणि चारित्र्य संपन्न असावा तसेच त्यांच्यात सामाजिक बांधिलकीची जाणीव आणि राष्ट्रीयत्वाची भावना वृद्धींगत होऊन देशासाठी त्याने कार्य केले पाहिजे. स्वयंसेवकांनी रचनात्मक आणि सृजनात्मक कार्यासाठी सलग झोकून दिले पाहिजे. समाजातील विविध समस्या, अडचणी सोडविण्यासाठी तत्परतेने कार्य केले पाहिजे.देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्म समभाव, सहिष्णुता, सामाजिक बांधिलकी, सामाजिक प्रबोधन, आरोग्य व पर्यावरण तसेच व्यसनमुक्ती, महिला जनजागृती, स्वच्छता व साक्षरता अभियान, श्रमदान यासाठी स्वयंसेवक कर्तव्यनिष्ठ असला पाहिजे. असे मार्गदर्शन प्रा. विलास चव्हाण यांनी आपल्या वैचारिक प्रबोधनातून केले. या कार्यक्रमाचे नियोजन चौथ्या गटाने केले. अरबाज पिंजारी या गट प्रमुखाने सूत्र संचलन आणि आभार प्रदर्शन केले. इतर सदस्यांनी सहकार्य केले



# सिकलसेल समुपदेशन आणि रक्त नमुना चाचणी शिबीर

शिबीराच्या चौथ्या दिवशी दुपारच्या सत्रात २.०० ते ५.०० वाजेपर्यंत सिकलसेल समुपदेशन आणि सिकलसेल आजाराची चाचणी करण्यासाठी रक्त नमुना तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. सिकलसेल हा रक्तातील लाल रक्तपेशींचा रोग आहे. बरेच रुग्णांना कुठलाही त्रास जाणवत नाही. परंतु काही वेळेस अचानक त्यांच्या शरीरात कुठेही वेदना होऊ लागतात.याचे कारण असे कि, तांबडया रक्तपेशी ज्या चक्तीसारख्या मऊशीर असतात. त्या विळयासारख्या अर्धवक्राकार व टीसुळ होतात. त्यांच्या आकारामुळे व ठिसूळपणामुळे या पेशी धारदार होतात व त्यांचे धारदार तुकडे होतात. परिणामी अंग दुखीचा परिणाम होऊ लागतो. दोन सिकलसेलच्या रुग्णांमध्ये वेगवेगळे परिणाम पण दिसून येतात. अशी माहिती सिकलसेलचे समुपदेशक श्री. दौलत मोरे यांनी दिली.

शिबिरात ८५ स्वयंसेवकांनी रक्ताची नमुना चाचणी करून घेतली. तालुक्याचे सिकलसेल समन्वयक श्री. कांतीलाल चव्हाण आणि म्हसदी येथील आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल पवार, आरोग्य सहाय्यक श्री. पी. डी. देवरे, आशा वर्कर व आरोग्य सहाय्यक यांनी यावेळेस उपस्थित राहून सेवा दिली.
या कार्यक्रमादरम्यान कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी भेट दिली. डॉ. सचिन नांद्रे यांनी स्वयंसेवकांशी संवाद साधला. शिबिरात मिळणारे भोजन, सुविधा आणि शिबिरात राबविले जाणारे कार्यक्रम या संदर्भात माहिती घेतली. डॉ. सचिन नांद्रे यांनी स्वयंसेवकांची उपस्थिती तपासली आणि स्वयंसेवकांची हजेरी घेतली.
या शिबिराचे आयोजन कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी केले. आभार प्रदर्शन अरबाज सत्तार मन्सुरी याने केले. डॉ. बाबासाहेब मोताळे व डॉ. वनिता पवार आदी उपस्थित होते.




GPS Map Camera
Mhasdi Pr.ner, Maharashtra, India
VCX8+XPV, Mhasdi Pr.ner, Maharashtra 424304, India
Lat N 20° 53' 54.9852" Long E 74° 25' 11.172"
03/02/23 03:44 PM


GPS Map Camera
Mhasdi Pr.ner, Maharashtra, India
VCX8+XPV, Mhasdi Pr.ner, Maharashtra 424304, India
Lat N 20° 53' 54.9852" Long E 74° 25' 11.172"


GPS Map Camera
Mhasdi Pr.ner, Maharashtra, India
VCX8+XPV, Mhasdi Pr.ner, Maharashtra 424304, India
Lat N 20° 53' 54.9852" Long E 74° 25' 11.172"


GPS Map Camera
Mhasdi Pr.ner, Maharashtra, India
VCX8+XPV, Mhasdi Pr.ner, Maharashtra 424304, India
Lat N 20° 53' 54.9852" Long E 74° 25' 11.172"

# शिबिराचा पाचवा दिवस : ०४ जानेवारी २०२३

शिबीराच्या पाचव्या  दिवशी सकाळच्या सत्रात ५.०० ते ७.०० वाजेपर्यंत नेहमीप्रमाणे योगासने, व्यायाम आणि प्रार्थना घेण्यात आली. सकाळी ८ ते ९.०० दरम्यान स्वयंसेवकांनी स्थानिक परिसर स्वच्छत केला. या दिवशी पोक्सो कायदा जनजागृती अभियानपर दत्तक गावात रॅलीचे आयोजन करण्यात आले. यासाठी स्वयंसेवकांना रॅली दरम्यान शिस्तीचे पालन कसे करावे याचे मार्गदर्शन करण्यात आले. स्वयंसेवकांना पोक्सो कायदा विषयी माहिती देण्यात आली. रॅलीत कोणकोणते घोषवाक्य व जनजागृतीपर घोषणा यांची उजळणी करण्यात आली.

## पोक्सो कायदा जनजागृती अभियानपर दत्तक गावात रॅली

पोक्सो कायद्याविषयी आपणास अल्पशी माहिती आहे. या कायद्या विषयी सखोल माहिती नसल्यामुळे अनेकदा विद्यार्थ्यांना माहिती देत असतांना शिक्षकांची देखील गडबड होते. भारत सरकारने २०१२ साली पोक्सो कायदा म्हणजे लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा केला आहे. लांगिक अत्याचार करणाऱ्या व्यक्तीला कठोरात कठोर शिक्षा देणे व बालकांची लैंगिक कुचंबणा थांबवणे हीच या कायद्यामागील मुख्य भूमिका आहे.

मुली आणि मुलांवरील लैंगिक अन्याय आणि अत्याचार यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. कित्येकदा लहान मुले – मुली यांना आपल्यावर अन्याय आणि अत्याचार होत आहे. हे देखील समजत नसते. का? तर ते त्याविषयी अनभिज्ञ असतात. त्यांना गुड टच आणि बॅड टच यातील फरक माहित नसतो. शाळा, हायस्कूल आणि महाविद्यालयातील मुल-मुली यांच्यात जनजागृती व्हावी. याच बरोबर ग्रामीण समाजातील नागरिक यांच्या पर्यंत ह्या कायद्याविषयी माहिती पोहचावी. याउद्देशाने दि. ४ जानेवारी २०२३ रोजी दत्तक गाव म्हसदी येथे सकाळी ९ ते ११  याकाळात " पोक्सो कायदा जनजागृती अभियान " अंतर्गत रॅलीचे आयोजन करण्यात आले. शिबीर स्थळापासून रॅलीची सुरुवात करण्यात आली. स्वयंसेवकांचे सात गट तयार करून प्रत्येक गटाला घोषणा देण्यासाठी घोषवाक्य देण्यात आली. प्रत्येक गट उत्साह पूर्वक घोषणा देत म्हसदी गावातील प्रत्येक चौकात आणि गल्लीत रॅली नियोजनबध्द मार्गक्रम करत म्हसदी ग्रामपंचायत समोर आली. म्हसदी ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी श्री. मेघ:श्याम बोरसे यांना ग्रामपंचायत समोर सर्व ८५ स्वयंसेवकांच्या सहीचे निवेदन देण्यात आले. पोक्सो कायदा संपूर्ण देशभर काटेकोरपणे राबविला जावा. व्यापकप्रमाणावर या कायद्याविषयी जनजागृती व्हावी. शासनाच्या उच्च स्तरापर्यंत हि माहिती पोहचावी याउद्देशाने हे निवेदन देण्यात आले.


GPS Map Camera
Mhasdi Pr.ner, Maharashtra, India
VCX8+XPV, Mhasdi Pr.ner, Maharashtra 424304, India
Lat N 20° 53' 54.9852" Long E 74° 25' 11.172"
04/02/23 10:57 AM


राष्ट्रीय सेवा योजना
पोक्सो (POCSO) ACT
जनजागृती अभियान


GPS Map Camera
Mhasdi Pr.ner, Maharashtra, India
VCX8+XPV, Mhasdi Pr.ner, Maharashtra 424304, India
Lat N 20° 53' 54.9852" Long E 74° 25' 11.172"
04/02/23 11:02 AM
NSS विशेष श्रमसंस्कार शिबीर - 2023

दुपारी १२ ते २ भोजन व स्वयंस्वच्छतेसाठी वेळ देण्यात आली. दुपारचे सत्र २.०० वाजता सुरु झाले. नेहमीप्रमाणे स्वयंसेवकांची उपस्थिती, चर्चा आणि एन.एस.एस. गीते घेण्यात आली. दुपारी ३ ते ५ दरम्यान वैचारिक प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दुपारी ३ ते ५ या वेळेत धुळे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयातील इंग्रजी विषयाचे प्राध्यापक **डॉ. वैभव सबनीस** यांचे **"मानसिक ताणतणावाचे व्यवस्थापन काळाची गरज"** या विषयावर वैचारिक प्रबोधनपर व्याख्यान झाले. **डॉ. वैभव सबनीस** यांनी मानसिक ताणतणावापासून आपण आपला बचाव कसा करू शकतो याचे मार्गदर्शन स्वयंसेवकांना केले. गीत आणि संगीत यांच्या सहाय्याने आपण मानसिक ताणतणाव पासून मुक्त राहू शकतो. म्हणून प्रत्येकाने आपले आवडते संगीत आणि गीते ऐकली पाहिजेत. गीत आणि संगीत ह्या कला जोपासल्या पाहिजेत. असे मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या व्याख्यान दरम्यान अनेक हिंदी मराठी गीते करोके तंत्रज्ञान वापरून सादर केले. महाराष्ट्र राज्याने नुकतेच राज्यगीत म्हणून मान्यता देलेले " जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा " आपल्या सुरेल आवाजात सादर केले. आपल्या ताल सुरात स्वयंसेवकांनाही आपल्या गीत सादरी करणात सामील करून घेतले.



सायंकाळी ५ ते ७ चहा-पान साठी वेळ देण्यात आला. नेहमीप्रमाणे स्वयंसेवकांची गट चर्चा घेण्यात आली. गट चर्चे अंतर्गत चर्चेसाठी पर्यावरण प्रदूषण, वृक्ष संवर्धन आणि बेरोजगारी असे विषय देण्यात आले. प्रत्येक गटाने आपापले विषय सादर केले. यादरम्यान प्रत्येकाला बोलण्यासाठी संधी देण्यात आली.

रात्री ७ ते ८ या रात्रीचे भोजन देण्यात आले. भोजन नंतर स्वयंसेवकांच्या कला गुणांना वाव मिळावा. याउद्देशाने गीत मंचचे आयोजन करण्यात आले. यात विद्यार्थ्यांनी विविध कला अविष्कार सादर केल. लोकगीत, लोकनृत्य इत्यादी सादर केले. काही विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन काही नाटिका सादर केल्या. नाटिकांचे विषय समाज प्रबोधन व जनजागृतीपर होते. अंधश्रद्धा निर्मुलन, शेतकरी आत्महत्या आणि बेरोजगारी अशा विषयांवर नाटिका सादर झाल्या. रात्री १० नंतर दिपमालवन झाले. शिबीराच्या सहाव्या दिवशी सकाळच्या सत्रात ५.०० ते ७.०० वाजेपर्यंत नेहमीप्रमाणे योगासने, व्यायाम आणि प्रार्थना घेण्यात आली. सकाळी ८ ते ९.०० दरम्यान स्वयंसेवकांनी स्थानिक परिसर स्वच्छत केला. या दिवशी प्लास्टिक कचरा मुक्ती व वृक्षरोपण या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

## शिबिराचा सहावा दिवस : ०५ जानेवारी २०२३

## माझी वसुंधरा अंतर्गत वृक्षरोपण

आपण ज्या पृथ्वीवर जन्माला आलो. त्या पृथ्वीला अर्थात वसुंधरेला आपण आपली माता मानतो. या वसुंधरेला आपण भूमाता असे म्हणतो. पृथ्वीला वसुधा, वसुंधरा, भूमी, जमीन, मेदिनी, धरणी, धरती आणि धरित्री अशी विविध नावे मराठी भाषेत आहेत. पृथ्वी म्हणजे वसुंधरा, माझी माता आहे. मी तिचे लेकरू आहे. हा सहसंबंध म्हणजे एक प्रेमाचा भावनिक धागा आहे. ज्या ठिकाणी अपत्य प्रेमाला आणि मातृ प्रेमाला मोठी जागा आहे. पृथ्वीवरील सर्व प्राणी मात्रेत मानव हा सर्वात बुध्दिमान प्राणी आहे. त्यामुळे पृथ्वीच्या अर्थात वसुंधरेच्या संरक्षणाची जबाबदारी एक बुद्धीशील प्राणी म्हणून मानवावर आहे. **"माझी वसुंधरा माझी जबादारी"** या भावनेने सर्व स्वयंसेवकांनी वसुंधरेचे रक्षण व संवर्धन केले पाहिजे. याभावनेतून माझी वसुंधरा या उपक्रमांतर्गत धनदाई डोंगर परिसर व धनदाई माता मंदिर परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. यासाठी प्रत्येक स्वयंसेवकाने एक वृक्ष (झाड) लावावे असे ठरविण्यात आले. याकरिता एक दिवस अगोदरच म्हसदी गावातील मुस्लीम बांधवांच्या इदगाह जागेत. **म्हसदी येथील रहिवाशी राज्यस्तरीय वृक्ष मित्र पुरस्कार प्राप्त**

**श्री.सुभान पिंजारी** यांनी नर्सरी विकसित केली आहे. या नर्सरीतून **वड, पिंपळ, औदुंबर, लिंब, आंबा, जांभूळ आणि चिंच** इत्यादी अनेक वृक्षांची चांगली वाढलेली **८५ रोपे** घेण्यात आली होती. त्या रोपांची लागवड धनदाई डोंगर आणि मंदिर परिसरात करण्यात आली. स्वयंसेवकांनी मोठया उत्साहाने वृक्षांचे रोपण केले. वृक्षांसाठी योग्य जागेची निवड करून खड्डे खोदली व वृक्षारोपण केले. काही स्वयंसेवक रोपांना पाणी टाकत होती. यादिवशी **८५ रोपांची यशस्वीपणे लागवड करण्यात आली.**

दुपारी ३ ते ५ या वेळेत नवलनगर येथील कला महाविद्यालयातील इंग्रजी विषयाचे प्राध्यापक **डॉ. उमेश गांगुर्डे** यांचे **"राष्ट्रीय सेवा योजना आणि नेतृत्व विकास"** या विषयावर वैचारिक प्रबोधनपर व्याख्यान झाले. **डॉ. उमेश गांगुर्डे** हे उत्कृष्ट किर्तनकार आहेत. त्यांनी आपल्या किर्तन शैलीतून स्वयंसेवकांचे प्रबोधन केले. राष्ट्रीय सेवा योजना हे तरुणांचे व्यक्तीमत्व विकास व नेतृत्वगुण विकसित करण्याचे माध्यम आहे. तरुणांनी राष्ट्रीय सेवा योजनेतून आपला नेतृत्व गुण वृदिंगत केला पाहिजे. स्वयंशिस्त, समाजसेवा, सामाजिक बांधिलकी, सेवाभाव, मूल्यशिक्षण यातून देश व समाजासाठी त्याग भावना स्वयंसेवकांमध्ये रुजविण्यात राष्ट्रीय सेवा योजना मोलाची आहे. स्वयंसेवक घडविण्यात राष्ट्रीय सेवा योजना सुवर्णमध्य आहे. युवकांनी समाजसेवा आणि देश सेवा, सामाजिक बांधिलकी व राष्ट्र व समाजाप्रती जबाबदारी उचलावी. असे मार्गदर्शन डॉ. गांगुर्डे यांनी केले.

सायंकाळी ५ ते ७ चहा-पान साठी वेळ देण्यात आला. नेहमीप्रमाणे स्वयंसेवकांची गट चर्चा घेण्यात आली. गट चर्चे अंतर्गत चर्चेसाठी पर्यावरण प्रदूषण, वृक्ष संवर्धन आणि बेरोजगारी असे विषय देण्यात आले. प्रत्येक गटाने आपापले विषय सादर केले. यादरम्यान प्रत्येकाला बोलण्यासाठी संधी देण्यात आली.

रात्री ७ ते ८ या रात्रीचे भोजन देण्यात आले. भोजन नंतर स्वयंसेवकांच्या कला गुणांना वाव मिळावा. याउद्देशाने गीत मंचचे आयोजन करण्यात आले. यात विद्यार्थ्यांनी विविध कला अविष्कार सादर केल. लोकगीत, लोकनृत्य इत्यादी सादर केले. काही विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन काही

नाटिका सादर केल्या. नाटिकांचे विषय समाज प्रबोधन व जनजागृतीपर होते. उद्याचा दिवस शिबिराचा समारोपाचा दिवस असल्याने त्यासाठी नियोजन करण्यात आले. स्वयंसेवकांना काही महत्वाच्या सूचना देण्यात आल्या. सर्व गटांना उद्याच्या समारोप कार्यक्रमाचे नियोजन संबंधी मार्गदर्शन करण्यात आले. रात्री १० नंतर कॅम्प फायर करण्यात आला. याप्रसंगी स्वयंसेवक व स्वयंसेविका यांनी मनसोक्त नृत्याचा आनंद घेतला. गाणे सादर केले. समूह नृत्य सादर केली. रात्री १२ नंतर दीप मालवण करण्यात आले.

# शिबिराचा सातवा दिवस : ०६ जानेवारी २०२३

शिबीराच्या सातव्या दिवशी सकाळच्या सत्रात ५.०० ते ७.०० वाजेपर्यंत योगासने, व्यायाम आणि प्रार्थना घेण्यात आली. सकाळी ८ ते ९.०० चहा व नास्ता देण्यात आला. सकाळी ९ ते १०.०० दरम्यान स्वयंसेवकांनी स्थानिक परिसर पूर्णपणे स्वच्छ केला. समारोपाचा दिवस असल्याने स्वयंसेवकांना १० ते ११ स्वयंस्वच्छतेसाठी वेळ देण्यात आला.

सकाळी ११.१५ ते १२.१५ यावेळेत कुसुंबा येथील ना. गो. चौधरी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील भूगोल विभागाचे प्राध्यापक डॉ. सिध्दार्थ सोनावणे यांचे वैचारिक प्रबोधनपर व्याख्यान झाले. डॉ. सिध्दार्थ सोनावणे यांनी "जल व्यवस्थापन काळाची गरज" याविषयावर व्याख्यान दिली.

दुपारी १२.१५ ते १.१५ यावेळेत कुसुंबा येथील ना. गो. चौधरी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील इंग्रजी विभागाचे प्राध्यापक व प्राचार्य डॉ. विजय बाविस्कर यांचे वैचारिक प्रबोधनपर व्याख्यान झाले.

दुपारी १.१५ ते २:३० यावेळेत भोजन अवकाश देण्यात आला. समारोपाच्या दिवशी गोड पदार्थासह भोजन देण्यात आले.

समाजसेवा ही संकल्पना आधुनिक राष्ट्रांच्या उभारणीमधील एक मूलभूत घटक आहेसमाजातील . रोजगार व आरोग् ,पर्यावरण .बेघर लोकांना मदत करणे ,अत्यंत गरीब व वंचितयविषयक जनजागृती करणेआधुनिक समाजरचनेच्या मूलभूत तत्त्वांची .हे राष्ट्रीय सेवा योजनेचे एक मुख्य कार्य आहे .

.समाजवाद व मानवी मूलभूत हक्कांविषयी जागृती झाली पाहिजे ,जपणूक करण्यासाठी लोकशाही जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी ज्या मूलभूत सेवा पुरविल्या जातात व ज्य◌ायोगे मानवी हक्कांची जपणूक होते .समाज सेवा हीच खरी राष्ट्र सेवा आहे .त्यांना सामाजिक सेवा म्हटले जाते , असे मत कवयित्री .स्वयंसेवकांनी सामाजिक बांधिलकी म्हणून सेवेसाठी तत्पर असले पाहिजे बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नवनिर्वाचित अधिसभा सदस्य प◌्राचार्य डॉ .बी .के . .डी .अण्णासाहेब आर .म्हसदी येथील धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे स्व .पाटील यांनी केले देवरे कला व विज्ञान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबीर धनदाई डोंगर फेब्रु ६ जानेवारी ते ३१ म्हसदी येथे दिनांक ,परिसरवारी या सात दिवसाच्या कालावधीसाठी आयोजीत करण्यात आले होते .शिबिराच्या समारोप समारंभाचे समारोपकर्ते म्हणून ते बोलत होते . ,सेवा ,श्रम .राष्ट्रीय सेवा योजना हि विद्यार्थी दशेतील आदर्श नागरिक घडवणारी संस्था आहे प्रबोधन व राष्ट्रीय एकात्मता जगायला शिक ,स्वच्छताविणारी हि एक आदर्श योजना असल्याचे मत कुसुंबा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉसुनिल बाविस्कर यांनी समारोप समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून . समूह संघटन आणि ,जबाबदारीची जाणीव ,स्वयंशिस्त ,श्रमदान .आपले मत व्यक्त केले आत्मविश्वास युवकांमध्ये उंचावण्याचे काम श्रमसंस्कार शिबिरातून होत असतेकारण अशा . प्रकारच्या शिबीरातून युवकांना जगण्याचे भान कळते असे मत समारंभाचे अध्यक्ष नवनिर्वाचीत .शिवाजी पाटील यांनी व्यक्त केले .सिनेट सदस्य प्राचार्य डॉ

या सात दिवसीय श्रमसंस्कार शिबिरात विविध प्रकारचे समाज उपयोगी उपक्रम राबविण्यात आले . लैंगिक अपराधापासून - पॉक्सो ,सिकलसेल समुपदेशन आणि सिकलसेल रक्त चाचणी शिबीर प्लॅस्टिक कचरा मुक्ती अभियान आणि माझी वसुंधरा ,बालकांचे संरक्षण कायदा जनजागृती रॅली व्यक्तिमत्व .झाडांची लागवड करण्यात आली ७५ जांभूळ व लिंबाचे ,औदुंबर ,पिंपळ ,अंतर्गत वड .विकास नेतृत्व विकासमानसिक ताणतणाव ,शेंद्रीय शेतीतून ग्राम विकास ,संवाद कौशल्य , स्वयंसेवकांच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्य आणि जल व्यवस्थापन या विषयांवर ,व्यवस्थापन शिबिराच्या समारोप समारंभात धनदाई तरुण .वैचारिक प्रबोधनपर व्याख्यानांचे आयोजन केले गेले

ऐक्य मंडळाचेसचिव श्रीसिध्दार्थ सोनवणे आणि साक्री तालुका राष्ट्रीय .डॉ ,महेंद्र दौलतराव देवरे .
या प्रसंगी शिबीराचे .हेमंतकुमार पाटील यांची उपस्थित होती .सेवा योजनेचे विभागीय समन्वयक डॉ
स्वयंसेवक अरबाज पिंजारी यान .रमेश अहिरे यांनी केले .अहवाल वाचन कार्यक्रम अधिकारी डॉ◌े
सूत्र संचलन केलेशिबिराच्या .मानसी देसले हिने केले .आभार प्रदर्शन स्वयंसेविका कु .
महिला सहाय्यक कार्यक्रम ,बाबासाहेब मोताळे .यशस्वितेसाठी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ
.वनिता पवार आणि सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले .अधिकारी डॉ
शिबिराची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

सकाळ TODAY

## धनदाईदेवी मंदिर परिसरात रासेयोचे शिबिर

म्हसदी, ता. १ : राष्ट्रीय सेवा योजनेचे घोषवाक्य आहे माझ्यासाठी नव्हे,तुमच्यासाठी यात निःस्वार्थ सेवाभाव आहे. त्यागाची भावना आहे. राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय एकतेचे सशक्त साधन मानले गेले आहे. राष्ट्रीय एकात्मता म्हणजे विविध समाजघटकांना एका राष्ट्रीय घटकात आणि प्रवाहात सामील करून घेण्याची प्रक्रिया मानली जाते. ही खऱ्या अर्थाने राष्ट्रभक्त घडविण्याची प्रक्रिया असल्याचे मत धुळे येथील प्रसिद्ध नाक, कान, घसातज्ज्ञ तसेच (स्व.) अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. संजयकुमार देवरे यांनी व्यक्त केले.



म्हसदी : राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित डॉ. संजयकुमार देवरे, अनिल देवरे, सुभाष देवरे, प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील.

येथील (स्व.) अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर धनदाईदेवी डोंगर परिसरात होत आहे. माजी सैनिक अनिल लोटनराव देवरे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. धनदाईदेवी तरुण ऐक्य मंडळाचे अध्यक्ष सुभाष देवरे, रासेयोचे साक्री तालुका विभागीय समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील, जिल्हा रासेयोचे माजी समन्वयक डॉ. वाल्मीक आढावे, प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील उपस्थित होते. कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. वनिता पवार यांनी आभार मानले.

सकाळ TODAY

## मानवी मूलभूत हक्कांविषयी जागृती व्हावी

### प्राचार्य डॉ. के. बी. पाटील : म्हसदीत देवरे महाविद्यालयाच्या शिबिराचा समारोप

▸ सकाळ वृत्तसेवा

म्हसदी, ता. ७ : समाजसेवा ही संकल्पना आधुनिक राष्ट्राच्या उभारणीमधील एक मूलभूत घटक आहे. समाजातील अत्यंत गरीब, वंचित, बेघर लोकांना मदत करणे, पर्यावरण, रोजगार व आरोग्यविषयक जनजागृती करणे हे राष्ट्रीय सेवा योजनेचे एक मुख्य कार्य आहे. आधुनिक समाजरचनेच्या मूलभूत तत्त्वांची जपणूक करण्यासाठी लोकशाही, समाजवाद व मानवी मूलभूत हक्कांविषयी जागृती झाली पाहिजे, अशी अपेक्षा कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नवनिर्वाचित अधिसभा सदस्य प्राचार्य डॉ. के. बी. पाटील यांनी व्यक्त केली.

येथील धनदाईमाता शिक्षण प्रसारक संस्थेचे स्वर्गीय अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर धनदाईदेवी मंदिरानजीकच्या डोंगर परिसरात ३१ जानेवारी ते ६ फेब्रुवारीदरम्यान झाले. शिबिराच्या समारोपप्रसंगी डॉ. पाटील बोलत होते. राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थिदशेतील आदर्श नागरिक घडवणारी संस्था आहे. श्रम, सेवा, स्वच्छता, प्रबोधन व राष्ट्रीय एकात्मता जागवत शिकविणारी ही एक आदर्श योजना असल्याचे मत कुसुंबा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील बाविस्कर यांनी व्यक्त केले. श्रमदान, स्वयंशिस्त, जबाबदारीची जाणीव, समूह संघटन आणि आत्मविश्वास युवकांमध्ये रुजवण्याचे काम श्रमसंस्कार शिबिरातून होत असते. कारण अशा प्रकारच्या शिबिरातून युवकांना जगण्याचे भान करून आणल्याचे मत समारोपाचे अध्यक्ष नवनिर्वाचित सिनेट सदस्य प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील यांनी व्यक्त केले. सातदिवसीय श्रमसंस्कार शिबिरात विविध प्रकारचे समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. पॉक्सो-लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायदा जनजागृती रॅली, प्लॅस्टिक कचरामुक्ती अभियान आणि वड, पिंपळ, औदुंबर, जांभूळ व शिवाच्या ७५ झाडांची लागवड करण्यात आली. व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्वविकास, संभाषणकौशल्य, सेंद्रिय शेतीतून ग्रामविकास, मानसिक तणावाचे व्यवस्थापन, जलव्यवस्थापन या विषयांवर वैचारिक प्रबोधनपर व्याख्याने झाली. शिबिराच्या समारोपात धनदाईदेवी तरुण ऐक्य मंडळाचे सचिव महेंद्र देवरे, डॉ. सिद्धार्थ सोनवणे, तालुका राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील उपस्थित होते. कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी अहवाल सादर केला. स्वयंसेवक अरबाज पिंजारी याने सूत्रसंचालन केले. स्वयंसेविका मानसी देसले हिने आभार मानले. सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे, महिला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. वनिता पवार, सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



म्हसदी : राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराच्या समारोपप्रसंगी विद्यापीठाचे अधिसभा सदस्य डॉ. के. बी. पाटील यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील आदी.

सकाळ TODAY



म्हसदी : सिकलसेल जनजागृती अभियानात सहभागी स्वयंसेवक.

# भारतातील सिकलसेल कमी तीव्रतेचा

## विलास वारुडे : देवरे महाविद्यालयाच्या शिबिरात जनजागृती

▸ **सकाळ वृत्तसेवा**

म्हसदी, ता. ४ : सिकलसेल हा रक्तातील लाल रक्तपेशींचा रोग आहे. प्रामुख्याने बालकांमध्ये व क्वचितप्रसंगी वयस्कांमध्येही तो आढळतो. एका गुणसूत्रातील जनुकात बदल झाल्यास मलेरियापासून बचाव होतो, परंतु असा बदल झालेले दुसरेही गुणसूत्र असल्यास मात्र रोगच उत्पन्न होतो. भारतातील सिकलसेलचा रोग जगाच्या इतर भागातील रोगापेक्षा कमी तीव्रतेचा असल्याचे मत धुळे जिल्ह्याचे सिकलसेल समन्वयक विलास वारुडे यांनी व्यक्त केले.

येथील (स्व.) अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी श्रमानुभव शिबिर धनदाईदेवी मंदिर परिसरात सुरू आहे. शिबिरात सिकलसेल जनजागृतीपर समुपदेशन व सिकलसेल रक्त नमुने चाचणी शिबिरप्रसंगी श्री. वारुडे मार्गदर्शन करत होते. अंग गारठणे, शरीरात पाण्याचे प्रमाण खूप कमी होणे, शरीराच्या तापमानात अचानक बदल होणे, प्राणवायूचा अभाव, जंतुसंसर्ग, अपुरे व अवेळी जेवण, शारीरिक श्रम, मानसिक तणाव यातून अंगदुखीचा त्रास जाणवतो. याच कारणांनी दोन सिकलसेलच्या रुग्णांमध्ये वेगवेगळे परिणामही पाहायला मिळत असल्याची माहिती सिकलसेल समुपदेशक दौलत मोरे यांनी दिली. शिबिरात ८५ स्वयंसेवकांची रक्त नमुने घेऊन सिकलसेलची चाचणी घेण्यात आली. तालुक्याचे सिकलसेल समन्वयक कांतिलाल चव्हाण आणि म्हसदी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल पवार, आरोग्य सहाय्यक पी. डी. देवरे, आशा वर्कर व आरोग्य सहाय्यक उपस्थित होते.

यादरम्यान कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी भेट दिली. डॉ. सचिन नांद्रे यांनी स्वयंसेवकांशी संवाद साधून शिबिरात मिळणाऱ्या सुविधा व शिबिरादरम्यान राबविले जात असलेल्या उपक्रमांची माहिती घेऊन स्वयंसेवकांची उपस्थिती तपासली. सिकलसेल समुपदेशन व रक्तचाचणी शिबिराचे आयोजन कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी केले. स्वयंसेवक अरबाज शाह याने सूत्रसंचालन केले. डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी आभार मानले. व्यवस्थापन महिला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. वनिता पवार यांनी केले.

पुण्य नगरी

# शेतीत सेंद्रीय खतांचा वापर करा : चव्हाण

**म्हसदी** : सध्याच्या शेती व्यवसायात उत्पादन वाढीसाठी मोठ्या प्रमाणात आधुनिक औषधांची फवारणी केली जाते. रासायनिक खते वापरली जातात. काही कालावधीनंतर मात्र जमिनीचा पोत खराब होतो. म्हणून शेतकऱ्यानीं सेंद्रीय खते, औषधे व अर्कांचा वापर केला पाहिजे, असे प्रतिपादन उद्यान पंडित राज्य पुरस्कार प्राप्त शेतकरी आर. के. चव्हाण यांनी केले. येथील अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष श्रमसंस्कार शिबीरप्रसंगी चव्हाण बोलत होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार सायली पाटील हिने मानले. याप्रसंगी कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे, डॉ. वनिता पवार आदी उपस्थित होते.




Smart Dhule Edition
Feb 14, 2023 Page No. 3

# पुण्य नगरी

# समाजसेवा हीच खरी राष्ट्रसेवा- प्राचार्य डॉ. के. बी. पाटील

**म्हसदी** - समाजसेवा ही संकल्पना आधुनिक राष्ट्रांच्या उभारणीमधील एक मूलभूत घटक आहे. समाजातील गरीब व वंचित, बेघर लोकांना मदत करणे, पर्यावरण, रोजगार व आरोग्यविषयक जनजागृती करणे हे राष्ट्रीय सेवा योजनेचे एक मुख्य कार्य आहे. आधुनिक समाजरचनेच्या मूलभूत तत्त्वांची जपणूक करण्यासाठी लोकशाही, समाजवाद व मानवी मूलभूत हक्कांविषयी जागृती झाली पाहिजे, असे प्रतिपादन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नवनिर्वाचित अधिसभा सदस्य प्राचार्य के. बी.पाटील यांनी केले. म्हसदी येथील धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या समारोपाप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. येथील धनदाई देवी डोंगर परिसरात हे शिबीर झाले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थी दशेतील आदर्श नागरिक घडवणारी संस्था आहे. श्रम, सेवा, स्वच्छता, प्रबोधन व राष्ट्रीय एकात्मता जगायला शिकविणारी ही एक आदर्श योजना असल्याचे मत कुसुंबा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनिल बाविस्कर यांनी केले. श्रमदान, स्वयंशिस्त, जबाबदारीची जाणीव, समूह संघटन आणि आत्मविश्वास युवकांमध्ये उंचावण्याचे काम श्रमसंस्कार शिबिरातून होत असते अशा प्रकारच्या शिबीरातून युवकांना जगण्याचे भान कळते असे मत समारंभाचे अध्यक्ष नवनिर्वाचीत सिनेट सदस्य प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील यांनी व्यक्त केले. शिबिरात विविध प्रकारचे समाजपयोगी उपक्रम राबविण्यात आले. सिकलसेल समुपदेशन व सिकलसेल रक्त चाचणी शिबीर, पॉक्सो - लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण कायदा जनजागृती रॅली, प्लॅस्टिक कचरा मुक्ती अभियान आणि माझी वसुंधरा अंतर्गत ७५ झाडांची लागवड करण्यात आली. व्यक्तिमत्व विकास, नेतृत्व विकास, संवाद कौशल्य, सेंद्रीय शेतीतून ग्राम विकास, मानसिक ताणतणाव व्यवस्थापन, स्वयंसेवकांच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्य आणि जल व्यवस्थापन या विषयांवर व्याख्याने झाले. याप्रसंगी धनदाई तरुण ऐक्य मंडळाचे सचिव महेंद्र देवरे, डॉ. सिध्दार्थ सोनवणे व साक्री तालुका राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील उपस्थित होते.शिबीराचे अहवाल वाचन कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी केले. स्वयंसेवक अरबाज पिंजारी याने सूत्रसंचलन केले. आभार स्वयंसेविका मानसी देसले हिने मानले. शिबिराच्या यशस्वितेसाठी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे, महिला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. वनिता पवार आदींनी परिश्रम घेतले.




Smart Dhule Edition
Feb 8, 2023 Page No. 4

# सकाळ धुळे

मंगळवार, १४ फेब्रुवारी २०२३

# TODAY



म्हसदी : पॉक्सो कायद्याची माहिती प्रशासनाकडे जलदगतीने जावी म्हणून माहितीचे निवेदन ग्रामविकास अधिकारी मेघश्याम बोरसे यांना देताना रासेयोचे स्वयंसेवक व प्राध्यापक.

# 'पॉक्सो'च्या जनजागृतीसाठी प्रबोधन

## म्हसदीत देवरे महाविद्यालयाची जनजागृतीसाठी रॅली

▸ सकाळ वृत्तसेवा

म्हसदी, ता. १३ : देशभर पॉक्सो कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी म्हणून जनजागृतीसाठी येथील (स्व.) अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांतर्फे रॅली काढण्यात आली. शिवाय ग्रामविकास अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

बालकांवरील लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या अंमलबजावणीला सुरवात झाल्यापासून बाललैंगिक अत्याचाराच्या घटना समोर येण्याचे प्रमाण वाढले आहे. अशा प्रकारच्या घटनेत पोलिसांकडून संवेदनशीलपणे चौकशी केली जात आहे. कायद्यानुसार पीडित मुलांची किंवा मुलींची माहिती, ओळख गुप्त ठेवली जाते. न्यायालयातही अशा प्रकारचे खटले जलदगतीने चालविले जात आहेत. संशयित आरोपी गुन्ह्यातून सुटणार नाही याची विशेष दक्षता घेतली जाते. अशा घटना घडूच नयेत यासाठी शाळा-महाविद्यालयात सामाजिक कार्यकर्त्यांकडून, पोलिस प्रशासनाकडून प्रबोधन केले जात आहे. समाजातील सर्वच घटकांनी दक्ष राहिल्यास बाललैंगिक अत्याचाराच्या घटनांवर नियंत्रण येईल. देशभर पॉक्सो बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा प्रभाविपणे राबवावा या उद्देशाने व्यापक जनजागृतीसाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी दत्तक गाव म्हसदी येथे पॉक्सो कायदा जनजागृतीपर अभियानांतर्गत रॅली काढण्यात आली. गावात प्रबोधनपर घोषणा देत अभियानाची माहिती शासनाच्या उच्च स्तरावर पोचावी म्हणून ग्रामविकास अधिकारी मेघश्याम बोरसे यांच्याकडे महाचे निवेदन देण्यात आले. धनदाईदेवी मंदिराजवळील डोंगर परिसरात (स्व.) अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या सातदिवसीय निवासी श्रमसंस्कार शिबिरात पॉक्सो कायदा जनजागृतीचे अभियान राबविण्यात आले. अभियानात ८५ स्वयंसेवकांचा सहभाग होता. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे, डॉ. वनिता पवार यांनी संयोजन केले.